सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय



# शून्यातून विश्व

मुद्रा योजनेमुळे घेतलेल्या भरारीच्या यशोगाथा



प्रधानमंत्री mudra योजना





**मीनल मोहाडीकर,**
पहिल्या महिला अध्यक्षा,
महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज् अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर

# तर यश तुमचेंच आहे...

जिद्द तुमची साथ आमची आम्ही उद्योगिनी ही संघटना ८ मार्च १९९६ पासून महिला उद्योगिनींना विनामूल्य उद्योग मार्गदर्शन करण्यासाठी मुंबईत दादर, बोरीवली, गोरेगाव तसेच कल्याण ठाणे, नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, रत्नागिरी, दुबई या ठिकाणी कार्यरत आहे. आजच्या युगाची गरज ओळखूनच पुढच्या पिढीला नोकऱ्या मिळणार नाहीत म्हणून उद्योग क्षेत्रात मोठया प्रमाणावर तरुणांना सहभागी करून घेण्यासाठी आमची संस्था कार्य करते. संघटनेच्या माध्यमातून कार्यरत असल्याने महिला आपला व्यवसाय नेटवर्कींगच्या माध्यमातून वाढवतात; तसेच बँक व शासकीय योजनांचा फायदा यामार्फत मिळवून दिला जातो.

आवड असेल तर सवड मिळते मग आपण व्यवसायाची निवड योग्य करू शकतो. आपली क्षमता ओळखून व्यवसायाची निवड करा.यासाठी आपले ज्ञान वाचनातून वाढवा व विचाराने अधिक प्रगल्भ होऊन नावीन्यपूर्ण विचार करा. उद्योग करताना नेहमी सकारात्मक विचार करावा म्हणजे समजा जर एक पेला अर्धा भरलेला आपल्याला दिसतो व अर्धा रिकामा तेव्हा आपण असा विचार करावा की, तो पेला अर्धा ऑक्सिजन ने भरला आहे व अर्धा पेला पाण्याने, म्हणजे माझा पेला पूर्ण भरला आहे. Always think positive

4A + 4C = Success in your life

A = Aspiration, Ability, Attitude, Adaptability

C = Communication, Creativity, Collaboration, Character

हे चार C नेहमी सर्वांनी लक्षात ठेवा. जीवन ही एक संधी आहे. संधी ही प्रत्येकाच्या आयुष्यात येते. मी म्हणेन की संधी ही दरवाज्याच्या बाहेर उभी आहे. जिद्द, मेहनत, सातत्य आणि ध्येय, उद्दिष्टे साध्य करण्याची धडपड यांवर उद्योगासारख्या संधीचे सोने होऊ शकते. संधीचा चांगल्या तऱ्हेने उपयोग केला तर उद्योगात, व्यवसायात प्रगती करता येते.

आज आपण सर्वजण २१ व्या शतकात एका सुधारणावादी संस्कृतीचे साक्षीदार म्हणूनच कार्यरत आहोत. खासकरून विज्ञान तंत्रज्ञान, उद्योग व्यवसाय, अर्थकारण या क्षेत्रात होणारा विकास आणि समृध्दी ही उदयाच्या नव्या सुधारणावादी संस्कृतीची पाऊलवाट समजली जाते.

स्त्री एक उत्तम व्यवस्थापक असते; कारण तिच्यावर जे संस्कार केले जातात त्यात वेळेचे व्यवस्थापन कसे करावे याचे बाळकडूही दिले जाते. उद्या तुला सासरी जायचे आहे तेव्हा सगळी कामे कशी झटपट उरकता आली पाहिजे हे कानावर पडत असतंच त्यामुळे आपोआप वेळेची बचत व कार्यसिध्दता यांचा मेळ जमू लागतो. त्यामुळे सांसारिक जबाबदाऱ्या पेलताना आजच्या स्त्रिया स्वत:चे करीअर, नोकरी, उद्योग करत आहेत. अष्टभुजा हे आहे देवीचे एक रूप; पण या रूपाची संकल्पना मुळात सर्वसामान्य स्त्रीकडे

बघूनच केली गेली असणार कारण एकाच वेळी अनेक कामे करण्याचे, त्यातील वेळेतील अचूक नियोजन करण्याचे आणि या सर्वातून आपली बुध्दी, कार्यक्षमता, अंगभूत कौशल्य आणि व्यवधान नेमके सांभाळायचे कसब खरोखरच वादातीत आहे. तिला प्रत्यक्षात आठ हात नसतील पण एकाच वेळी आठ हातानीच काय केव्हा केव्हा दहा, बारा, सोळा हातांनी ती अनेकानेक कामे करत असते. स्त्रीला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी विशेषत: स्वयंरोजगार चालू करण्यासाठी तिच्या या अष्टावधानी गुणांची सर्वाधिक आवश्यकता असते. आपल्या छंदाचा ही उपयोग उद्योगासाठी करता येईल SWOT Analysis S- Strength , W-Weaknesses, O–Opportunities, T-Threat याचा विचार स्वत:च करून कोणत्या गोष्टीत आपल्याला गती व प्रावीण्य आहे याचा विचार करून आपल्या हातातील कलेला, कामाला वाव द्यावा. आपली क्षमता ओळखून पावले टाकावीत.

जागतिक महिला दिन ८ मार्च हा दिवस सर्व ठिकाणी वेगेवगेळया संस्था, संघटनांच्या माध्यमातून महिलांसाठी देश विदेशात साजरा करण्यात येतोच. आम्ही उद्योगिनी संस्थेमार्फत राज्यव्यापी उद्योजक महिला परिषद ४ मार्च २०१७ रोजी राजा शिवाजी विद्यालय दादर (पू) येथे आयोजित करण्यात आली. ह्या परिषदेत उद्योगिनींना बाजारपेठ मिळावी, फायनान्स कुठे उपलब्ध होतो, गव्हर्नमेंटच्या योजना काय आहेत? महिलांनी महिलांना कशी मदत करावी? Networking of the business या सर्वांची माहिती त्या त्या क्षेत्रातील दिग्गजांमार्फत देण्यात येते. सभागृहात प्रत्येक उद्योगिनींच्या चेहऱ्यावर एक नवचैतन्य असते. काही अपयशी उद्योगिनींना स्फूर्ती मिळते. जाताना प्रत्येक उद्योगिनी उद्योगासाठी पूरक असे ज्ञान व महाराष्ट्रातील महिला उद्योगिनींचे अनुभव रिटर्न गिफ्ट म्हणून घेऊन जातात. परिषदेतून उपस्थितांना स्वोट ॲनालिसिस करणे सोपे जाते की आपण काय करू शकतो? काय करीत आहोत? अजून काय करू शकतो? तसेच नवीन जोमाने व जिद्दीने काम करायला उद्योगिनी तयार होतात.

दरवेळी भाजी खरेदी करताना घाईगर्दीत पटकन चिरता येतील अशाच भाज्या निवडाव्या लागतात. ज्या निवडणे, चिरणे कठीण त्या फुरसतीच्या वेळी आणल्या जातात किंवा आणू आणू म्हणता आणल्या जात नाहीत. कुणी या भाज्या निवडून चिरून घरपोच आणून देईल तर काय बहार होईल! पण आज खरोखरच अनेक स्त्रिया अशा प्रकारे नीट चिरलेल्या, कापलेल्या भाज्या, वाटलेले आलं लसूण, मसाले ऑर्डर घेऊन घरपोच देण्याचा उद्योग करीत आहेत. त्याला शिक्षणाची फारशी गरज नसते. पहिल्या काही दिवसांच्या भाज्यांपुरते अल्प भांडवल उभे केले की मग खेळता पैसा हाती येत राहतो. व्याप वाढला तर मदतीसाठी एक ते दोन स्त्रियांना रोजगार ही उपलब्ध करून देता येतो. विविध पूजांसाठी पूजेचे साहित्य लागत असते. ते साधारणतः एकच असते. पण काही धार्मिक पूजांमध्ये आणखीन काही विशेष गोष्टी हव्या असतात. अशा साहित्याचा एकत्र बॉक्स करुन विक्री करता येतो. आता सध्या लग्नसराईचा मोसम आहे. त्या निमित्ताने लग्नाची तयारी करून देणे, रुखवत बनवणे, कपडे खरेदी, मेक्अप करणे असही सेवा उद्योग आपण करू शकतो. अलीकडे मुलांना सांभाळणारी अनेक पाळणाघरे असतात; पण वृद्धांची देखभाल करण्यासाठी खूप कमी प्रमाणात सुविधा उपलब्ध आहेत त्यांना सोबतीची गरज असते. अशावेळी सोबत देण्याचा व्यवसाय हा सेवा उद्योग अनेक स्त्रिया फावल्या वेळात करू शकतात. त्यांना पुस्तक वाचून दाखविणे, वेळच्यावेळी जेवण करून देणे, देखभाल करणे अशी कामे अगदी कॉलेजात शिकणारी आणि पैशाची गरज असणारी मुलगीही सहज करू

शकेल. आणी त्याचवेळी निवांतपणे आपला अभ्यासही करू शकेल.

आपल्या प्रत्येक वस्तूचे मार्केटींग कुठे करता येईल? बाजारपेठ कुठे व कशी उपलब्ध आहे? आपल्या वेगवेगळ्या स्पर्धकांच्या वस्तूंच्या बाजारात किंमान व कमाल किंमती काय आहेत? याचा अभ्यास करुनच आपल्या प्रॉडक्टची किंमत ठरवावी लागेल विक्री ही लक्ष्मींची पाठराखीण आहे. त्यामुळे तुमच्या विक्री व्यवस्थेवर तुमच्या व्यवसायाची घडी बसवता येते. पण ह्या सगळयाहून महत्वाची गोष्ट म्हणजे आपण उत्पादन करीत असलेली वस्तू चोख व निर्दोष असायला हवी यावर कटाक्ष हवा; कारण ग्राहक म्हणून तुम्ही स्वत: हीच अपेक्षा ठेवत असता. एक स्त्री काय करते? चालते चालवते; शिकते, शिकवते; जगते, जगवते दशांगुळे व्यापूनही शिल्लक उरते.एक स्त्री काय करते वाफ होऊन आभाळात विरते. पावसाचा थेंब होऊन सागरात शिरते. सातत्याने, उद्योगाचे हे चक्र चालते, उद्योगाचा वसा जपते....

आज सर्वच क्षेत्रात स्त्रियांचा वाढता प्रभाव लक्षात घेतल्यास येणाऱ्या काळात माहिला अधिक भक्कमपणे आणि बळकटपणे काम करताना दिसतील.केवळ उद्योग क्षेत्राबद्दल बोलायचे असल्यास महिलांच्या बाबतीत इथले चित्र बदलत आहे. महिला तसेच तरुण उद्योजक या क्षेत्रात येताना दिसत आहेत.विज्ञान व तंत्रज्ञानासोबतच जगात तितक्याच वेगाने उद्योग व्यवसायाची वाढ आणि तीव्रता वाढत आहे. याही क्षेत्रात संधीची नवनवीन क्षितिजे तयार झाली आहेत. उद्योग, विकास, विज्ञान आणि तंत्रज्ञान याबाबतीतचा विचार केला तर त्यामध्ये भारताचा सहभाग हा अत्यंत महत्वपूर्ण आहे. भारत हा मिश्र अर्थव्यवस्थेवर आधारलेला देश असून तो अन्न, धान्य, आयुर्विमा, वाहतूक, दळणवळण, पर्यटन, हॉटेलसारख्या व्यवसायातही आज महत्वाच्या स्थानावर आहे. उद्योग हा काही चमत्कार नाही. त्यासाठी आपल्या नसानसातून उद्योगाचे अस्तित्व भिनायला हवे. हा काही स्वर्गातून अवतरलेला चमत्कार नाही तर त्याचे यश हे आपली काम करण्याची जिद्द, चिकाटी, व्यवसायातले योगदान, उद्योगासंदर्भात असलेले आपले स्वत:चे विचार आणि सर्वात महत्वाचे म्हणजे उद्योग सुरू करताना आपण आपल्या डोळ्यासमोर ठेवलेली ध्येये आणि उद्दिष्टे. उद्योगाचे यश हे या सर्व घटकांवर अवलंबून आहे.जसे आपल्याला लाभलेले जीवनही एक संधी आहे. तिचा उपयोग कसा करायचा हे प्रत्येकावर अवलंबून आहे. आलेल्या संधीचे सोने आपल्याला करता आले पाहिजे.

आज उद्योग जगतात वावरणाऱ्या प्रत्येक स्त्रीने P प्रामुख्याने लक्षात ठेवावा प्रामुख्याने हे तीन पी कोणत्याही स्त्री मध्ये आढळतातच P-Patience, P-Perseverance, P-Perfection चिकाटी, संयम, दीर्घोद्योग आणि परिपूर्णतेकडे जाण्याचा तिचा ध्यास कोणत्याही अडचणीवर सहजगत्या मात करू शकतो.. आपले ध्येय, जिद्द, कष्ट आणि अभ्यासूवृत्ती ह्या गोष्टींच्या सोबतीने उद्योग सुरू करा; यश हे तुमचेच असेल.